
क्र. १२५ पहिले वर्ष

२२ जानेवारी २०२३

# रविवारची  उपासना

## सामान्यकाळातील तिसरा रविवार

### प्रस्तावना

करिंथ शहरात वेगवेगळ्या मंडळींना वेगवेगळ्या ख्रिस्तसेवकांनी बाप्तिस्मा संस्कार दिला होता. प्रत्येकजण आपापल्या गटाला वेगवेगळ्या नावाने ओळखू पाहात होता. अशा परिस्थितीत संत पौल त्यांना सांगतो की, आपण सर्वांनी ख्रिस्ताचा ध्वज स्वीकारला आहे. त्याच्या नावाने बाप्तिस्मा घेऊन आपण सर्वजण एकाच ख्रिस्ताची भावंडे झालो आहोत.

आपल्या सर्वांमध्ये ऐक्यभाव असावा म्हणून ह्या मिस्साबलीमध्ये विशेष प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, आमच्या अंत:करणातील तुझ्यावरील प्रीतीला योग्य दिशा दाखव. मनुष्यजातीमध्ये ऐक्य व शांती निर्माण करण्याचे कार्य तुझ्या पुत्राच्या नावाने आम्हांकडून घडव. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त, ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन** ९:१–४

**''गालील येथे अंधारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला.''**

त्याने मागील काळी जबुलून प्रांत आणि नफताली प्रांत यांची अप्रतिष्ठा केली तरी पुढील काळी समुद्रतिरीचा प्रदेश, यार्देनच्या पलीकडील प्रांत, गालील यांची तो प्रतिष्ठा करील.

अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे. मृत्युछायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे. तू राष्ट्राची वृध्दी केली आहे. त्याला महानंदप्राप्ती करून दिली आहे. हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदाप्रमाणे, लूट वाटून घेणाऱ्या लोकांच्या आनंदाप्रमाणे, ते तुझ्यासमोर आनंद करतात. कारण मिद्यानाच्या दिवसाप्रमाणे तू त्याच्या भाराचे जू, त्याच्या खांद्यावरची काठी, त्याच्यावर जुलूम करणाऱ्याचा सोटा मोडला आहे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

२६:१,४,१३–१४

प्रतिसाद : **परमेश्वर माझा प्रकाश आणि माझे तारण आहे.**

१. परमेश्वर माझा प्रकाश आणि माझे तारण आहे, मी कोणाची भीती बाळगू? परमेश्वर माझ्या जिवाचा दुर्ग आहे, मी कोणाचे भय धरू?

२. परमेश्वराजवळ मी एक वरदान मागितले, त्याच्या प्राप्तीसाठी मी झटेन; ते हे की, आयुष्यभर परमेश्वराच्या घरात माझी वस्ती व्हावी, म्हणजे मी परमेश्वराचे मनोहर रूप पाहत राहीन आणि त्याच्या मंदिरात ध्यान करीन.

३. ह्या जीवनाचा परमेश्वर खात्रीने माझे कल्याण करील. परमेश्वराची प्रतिक्षा कर. खंबीर हो, हिम्मत धर, परमेश्वराचीच प्रतिक्षा कर.

### दुसरे वाचन

**पौलचे करिंथकरास पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १:१०–१३**

**''तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असो आणि तुमच्यामध्ये फूट न पडो.''**

बंधुजनहो, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने तुम्हांस विनंती करतो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे, म्हणजे तुमच्यामध्ये फूट पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एक मनाने जोडलेले व्हावे. माझ्या बंधूनो तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच माणसांकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकजण ''मी पौलचा, मी आपुल्लोचा,'' ''मी केफाचा'' आणि मी ''मी ख्रिस्ताचा'' आहे असे म्हणतो. ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय? पौलला तुम्हांसाठी क्रूसावर खिळले होते काय? पौलच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला होता काय? कारण ख्रिस्ताने मला बाप्तिस्मा करावयास नव्हे तर सुवार्ता सांगावयास पाठवले, पण ख्रिस्ताचा क्रूस व्यर्थ नव्हे तर सुवार्ता वाक्चातुर्याने सांगण्यास पाठवले नाही.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### जयघोष

**मत्तय ४:२३**

**आलेलुया, आलेलुया!**

येशूने देवराज्याची सुवार्ता जाहीर केली आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग बरे केले.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तय लिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

४:१२–२३

**''यशया संदेष्ट्याच्याद्वारे जे प्रकट केले ते पूर्ण व्हावे म्हणून येशू कफर्णहूमास आला.''**

योहानला अटक झाली आहे हे ऐकून येशू गालीलात निघून गेला आणि नाझरेथ सोडून जबुलून आणि नफताली ह्यांच्या हद्दीत असलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील कफर्णहूमास जाऊन राहिला; हे अशासाठी की, यशया संदेष्ट्याच्याद्वारे जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे ते असे की:

जबुलून प्रांत आणि नफताली प्रांत, समुद्रकिनाऱ्यावरचा यार्देनचा पलीकडचा, परराष्ट्रीयांचा गालील–अंधकारात बसलेल्यांवर प्रकाशाचा उदय झाला आहे आणि मृत्यूच्या प्रदेशात आणि छायेत बसलेल्यांवर ज्योती उगवली आहे. तेव्हापासून येशू घोषणा करीत सांगू लागला, ''पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे.'')

गालील समुद्राजवळून तो चालला असताना त्याने पेत्र म्हटलेला शिमोन आणि त्याचा भाऊ आंद्रिया ह्या दोघा भावांना समुद्रात जाळे

टाकताना पाहिले., कारण ते मासे धरणारे होते. त्याने त्यांना म्हटले, ‘‘माझ्यामागे चला म्हणजे मी तुम्हांला माणसे धरणारे करीन.’’ लागलेच ते जाळी सोडून देऊन त्याला अनुसरले. तेथून पुढे गेल्यावर त्याने दोघे भाऊ म्हणजे जब्दीचा मुलगा याकोब आणि त्याचा भाऊ योहान ह्यांना आपला बाप जब्दी ह्याच्याबरोबर तारवात आपली जाळी नीट करताना पाहिले आणि त्याने त्यांना बोलावले. मग लागलेच ते तारू आणि आपला बाप ह्यांना मागे सोडून त्याला अनुसरले. नंतर येशू यहुदी लोकांच्या सभास्थानात शिक्षण देत. देवराज्याची शुभवार्ता चहूकडे सांगत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग आणि सर्व प्रकारची दुखणी बरी करीत गालीलभर फिरला.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक –** माझ्या बंधुभगिनींनो, अखिल मानवजातीचे तारण व्हावे अशी आमच्या परमेश्वरपित्याची इच्छा आहे. सत्याचे ज्ञान मिळवण्यासाठी तो आम्हांला पाचारण करतो. संपूर्ण अंत:करणाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** हे प्रभू, आमच्या कुटुंबाला आशीर्वादीत कर.

१. ख्रिस्तमंडळाची सेवा करणारे आपले पोपमहाशय, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स ह्यांना सामाजिक व आध्यात्मिक कार्य करण्यास परमेश्वराचे मार्गदर्शन व प्रेरणा मिळावी म्हणून प्रार्थना करू या.

२. ख्रिस्त सभेची सेवा करण्यास आपल्या धर्मग्रामातून अधिकाधिक तरुण–तरुणींना पाचारण घडावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आपल्या धर्मग्रामात वेगवेगळ्या संघटनांवर कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना कार्य करण्यास आध्यात्मिक बळ लाभावे म्हणून प्रार्थना करू या.

४. गरीब, आदिवासी, तळागाळातील लोकांच्या कल्याणासाठी जे मिशनरी कार्य करतात त्यांच्या कार्यात नेहमी यश यावे म्हणून प्रार्थना करू या.

५. जे धर्मगुरू, धर्मभगिनी व ब्रदर्स जगाच्या कानाकोपऱ्यात ख्रिस्ताचे कार्य करतात त्यांना पवित्र आत्म्याचे दान व मार्गदर्शन लाभावे म्हणून प्रार्थना करू या.

आता थोडा वेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक आणि श्रध्देने करीत असलेल्या आमच्या विनंत्या आज मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या दानांचा स्वीकार कर. ह्या दानांमुळे आमचे पावित्र्य वाढव व आम्हांला मुक्तीचे वरदान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे परमेश्वरा, सर्वशक्तीमान पित्या, तू आम्हांला दिलेल्या नवजीवनाद्वारे तुझ्यावरील आमची भक्ती वाढव. तुझ्या राज्यातील अनांदाचा अनुभव घेण्यास आम्हांला सिध्द कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

सामान्यकाळातील तिसरा रविवार हा देवशब्द रविवार म्हणून साजरा केला जातो. आजची वाचने पाचारण ह्या विषयावर आपल्यासमोर तीन चिंतने सादर करतात.

**अ) परिपूर्ण आनंद अनुभवण्याच्या हेतूने परमेश्वराच्या प्रकाशात चालत राहणे :** आजचे पहिले वाचन होते (यशया ८:२३, ९:३) इस्राएली लोकांच्या जीवनातील अंधारी बाजू सादर करते. ह्या अंधारात बसलेले लोक लवकरच मोठा प्रकाश पाहणार आहेत असा आशावाद यशया व्यक्त करतो. त्यानंतर मात्र त्यांच्या वाट्याला जो परिपूर्ण आनंद येणार आहे, त्याची तुलना हंगाम, शत्रूंवर विजय, गुलामगिरीतून मुक्तता ह्या सर्व प्रसंगी होणाऱ्या आनंदाशी करण्यात आलेली आहे असा आनंद खाजगी स्वरूपाचा नसतो. तो इतरांबरोबर राहूनच मिळविता येतो. परमेश्वर मानवाला अशश सामुदायिक आनंदासाठी पाचारण करतो.

**२) सुवार्ता घोषविण्याच्या हेतूने आपापसांत ऐक्य साधणे :** आजचे दुसरे वाचन (१ करिंथ.१:१०–१३) करिंथ येथल्या ख्रिस्ती लोकांमध्ये पडलेली फूट सादर करते. संत पौलने त्यांना येशूची सुवार्ता सांगितल्यानंतर तेथे अपुल्लो नावाचा प्रभावी वक्ता अवतरला. त्यानंतर जेरूसलेममधून संत पीटरच्या अधिकाराचा बडेजाव मिरविणारी मंडळी आली. पौल, पेत्र, अपुल्लो ह्यांना मानणारे तीन गट पडले. चौथ्या गटाने ख्रिस्ताच्या झेंड्याखाली राहणे पसंत केले. ह्या सर्वांना सुवार्ता प्रसाराच्या यशासाठी एकत्र यावे असे आवाहन पौलने केलेले आहे.

**क) इतरांचे नेतृत्व करण्याच्या हेतूने येशूचे शिष्यत्व पत्करणे :** आजच्या शुभवर्तमानाचे (मत्तय ४:१२–२३) दोन भाग पडतात. पहिल्या भागात येशू सर्वांना (यहुदी व बिगरयहुदी) पश्चात्तापाच्या मार्गाने स्वर्गाकडे येण्याचे आवाहन करतो. दुसऱ्या भागात तो चार प्रेषितांना पाचारण करतो. इतरांचे नेतृत्व करण्यासाठी (माणसे धरणारे) त्यांना स्वत:चा व्यवसाय (मासे धरणे) सोडून देण्यास सांगण्यात आलेले आहे.

**आत्मपरीक्षण :** आत्मकेंद्रितपणाकडून नि:स्वार्थी सेवेकडे जाण्यासाठी परमेश्वराची आपल्याला जी हाक आहे तिला प्रतिसाद देण्यासाठी मला माझ्या जीवनात कोणकोणत्या प्रकारचा बदल करायला लागेल ?

●●●

| जानेवारी २०२३ | | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम २३ | सं मारियान कोपे (हि) | : इब्री.१:१५,२४–२८/मार्क ३:२२–३० | |
| मंगळ २४ | सं फ्रान्सिस डि सेल्स (पां) | : इब्री.१०:१–१०/मार्क ३:३१–३५ | |
| बुध २५ | सं पॉलचे परिवर्तन (पां) | : प्रे.कृ.९:१–२२/मार्क १६:१५–१८ | |
| गुरू २६ | सं तिमथी व टायटस (पां) | : २ तीमथी १:१–८/मार्क ४:२१–२५ | |
| शुक्र २७ | सं आंजेला मेरिसी (हि) | : इब्री.१०:३२–३९/मार्क ४:२६–३४ | |
| शनि २८ | सं अपोलिनारीस क्लॉडिअस (तां) | : इब्री.११:१–२, ८–१९/मार्क ४:३५–४१ | |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)